# <u>प्रेस नोट दि. २७/०९/२०१९</u>

**दरोडयाचे गुन्हयातील रेकॉर्डवरील ७ गुन्हयात पाहिजे आरोपीस अटक,**

**विधानसभा निवडणुकीच्या अनुशंगाने सोलापूर तालुका पोलीस ठाणेची दमदार कामगिरी ,**

दि. २७ / ९ / २०१९ रोजी सोलापूर तालुका पोलीस ठाणे कडील गु. र. नं. १३५/२००६ भादवि ३९५, ३९७ कोर्ट केस नं. एस. सी. १५३/२०१५ मधील नॉन बेलेबल वॉरंट मधील आरोपी नामे नंदु उर्फ नंदया भारत काळे रा. देगाव, ता. मोहोळ यास अटक करण्यात आलेली असून सदर आरोपी हा सोलापूर ग्रामीण जिल्हयातील बार्शी शहर पोलीस ठाणेस सन २०११ मधील घरफोडीच्या ३ गुन्हयात , वैराग पोलीस ठाणेकडील सन २०१५ मधील २ घरफोडी, व १ सरकारी कामात अडथळा करुन खूनाचा प्रयत्न करणे अशा एकुण ३ गुन्हयात तसेच. माढा पोलीस ठाणेस सन २०११ मधील १ घरफोडीच्या गुन्हयात पाहिजे आरोपी आहे. अशा विविध पोलीस ठाणेस दरोडा, घरफोडी, चोरी, सरकारी नोकरावर खूनी हल्ला करणे अशा प्रकारचे एकुण ०८ गुन्हे दाखल असलेचे निष्पन्न झालेले असून त्याचेकडून आणखीही अनेक गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे.

आगामी विधानसभा निवडणुकीच्या अनुशंगाने मा. पोलीस अधिक्षक सो. सोलापूर ग्रामीण यांचे सुचनेनुसादर रेकॉर्डवरील गुन्हेगार, वॉरंट बजावणी तसेच टु प्लस गुन्हयातील आरोपी चेक करणे तसेच शस्त्र अधिनियमाप्रमाणे गुन्हयातील आरोपींची घरझडती घेण्याची मोहिम प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. त्या अनुशंगाने सोलापूर तालुका पोलीस ठाणेची ही कारवाई करण्यात आलेली आहे. यापुढेही अशीच कारवाई सुरु राहील असे पो. नि. जगताप यांनी सांगितले.

सदरची कामगिरी ही मा. मनोज पाटील पोलीस अधिक्षक सो सोलापूर ग्रामीण व मा. अतुल झेंडे अप्पर पोलीस अधिक्षक सो., मा. प्रभाकर शिंदे उप विभागीय पोलीस अधिकारी सोलापूर विभाग सो. यांचे मार्गदर्शनाखाली सोलापूर तालुका पोलीस ठाणेकडील पो. नि. श्री. सुहास जगताप, पोहेकॉ/८६८ सुळ, पोना/१८३० गावीत व मपोकॉ/१०२८ शेख यांनी पार पाडली आहे.

प्रति,

मा. संपादक,

नमुद बातमी आपले लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द होणेस विनंती आहे.

Scanned by CamScanner